# कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात सायबर गुन्हे जनजागृती उपक्रम संपन्न



शहादा : पूज्य सानेगुरुजी विद्याप्रसारक मंडळाच्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सायबर क्राईम अवेअरनेस याविषयी विद्यार्थिनींसाठी जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात सायबर क्राईम अवेअरनेस या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रम अधिकारी (रासेयो) प्रा.डॉ. राजेंद्र पाटील यांनी केली.कु. गायत्री ठाकरे आणि कु. श्रेया भोम्बे यांनी विद्यार्थिनींना सायबर क्राईम या विषयी सविस्तर माहिती दिली. कु.गायत्री ठाकरे हिने मोबाईल वर कोणा अनोळखी व्यक्तीशी बोलतांना कशी काळजी घ्यावी तसेच मोबाईल मधील यु-ट्यूब, इन्स्टाग्राम इत्यादी प्स पाहतांना ते आपल्या घरातील पालक यांच्यासमोरच पहावेत याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यालयातील शिक्षिका श्रीमती मोहिनी चव्हाण यांनी कार्यक्रमाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. आभार मोहिनी चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील मुख्याध्यापिका निलिमा पाटील, गृहप्रमुख मनिषा पाटील, मोनाली धारणे यांनी प्रयत्न केले.

या उपक्रमाचे पूज्य सानेगुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष दिपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील,सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूर दीपक पाटील यांनी स्वागत व कौतूक केले आहे.